# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १४/०३/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणकु प्रक्रीया शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्याचे दृष्टीने मॉक डिस्पर्सल प्रशिक्षण नागपूर ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे अतंर्गत रूटमार्च घेण्यात आले.

आज दिनांक १४/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथे १०.०० वा ते ११.०० वा पर्यंत मॉब डिस्पर्सल प्रॅक्टिस व ११/१५ वा. ते १२/४५ वा. पर्यंत खापरखेडा टाऊन, वलनी, चणकापूर व सिल्लेवाडा येथे मा. धनाजी जळक, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन खापरखेडा यांचे मार्गदर्शनाखाली रूट मार्च घेण्यात आला सदर रूट मार्च करिता १ पो.नी १ सपोनी ०४ पोउपनि व RPF पथक RCP पथक असे ६० पोलीस अमलदार हजर होते.

पोस्टे उमरेड येथे आज रोजी सकाळी ९/३० वाजता ते दुपारी १२/४५ वाजता दरम्यान आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ निमित्य उमरेड शहर, राजूरवाडी, व मांडवा गावात रूट मार्च, कोम्बिंग ऑपरेशन करण्यात आले सदर कार्यक्रमात पोस्टे उमरेड तर्फे सपोनि कृणाल रामटेके, मसपोनि मलकुवार मॅडम, पोउपनी रवीद्रं वाघ  व पोस्टेचे २१ अंमलदार व Rpf पथक मुबंई पश्चिम रेल्वे चे दोन अधिकारी व २२ अंमलदार हे रूटमार्च व कोम्बिंग ऑपरेशन करीता असे एकूण ५ अधिकारी व ४३ अंमलदार हजर होते

दिनांक १२/०३/२०२४ रोजी १६/०० वाजता पासून ते १७/१५ वाजता पर्यंत माननीय श्री संताेष गायकवाड साहेब उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग कन्हान, माननीय श्री दीपक अग्रवाल साहेब, ए एस पी, (IPS) श्री उमेश पाटील साहेब, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन यांचा उपस्थितीत सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ संबंधाने पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत रूट मार्च घेण्यात आला सदर रूट मार्चमध्ये ०८ अधिकारी २५ RPF अंमलदार २२ अंमलदार व होमगार्ड उपस्थित होते.

दि. १३/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे ११/०० वा ते १८/३० वा. पर्यंत मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांचेसह पोलीस स्टेशन हद्दीमधील देहेगाव जोशी, करंभाड, तामसवाडी, पालोरा, नयाकुडं, नवेगाव खैरी, चारगाव, पालासावळी गावामध्ये व पारशिवनी शहरामध्ये रूट मार्च घेण्यात आला. रूट मार्च करिता २ पो.नि. ०३ पोउपनि व RPF पथकातील २२ जवान, पोलीस स्टेशनचे १२ अंमलदार व १२ होमसैनिक हजर होते.




POLICE


POLICE


MAHARASHTRA
POLICE

## पत्नीचा खुन करणाऱ्या पतिला भिवापूर पोलीसांनी केले अटक

दिनांक १३/०३/२०२४ चे ५.०० वा. ते ०८.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— प्रमोद कुसन वावरे वय ४० वर्ष, नगर पचं ायत समोर भिवापुर याने पत्नी मृतक नामे—सौ. दुर्गा प्रमोद वावरे, वय ३२ वर्ष रा. नगर पंचायत समोर भिवापुर हिच्या चारीत्र्यावर संशय घेवुन तिला शारीरीक व मानसीक त्रास देवुन तिला माहेरून पैसे आणण्याचे कारणावरून तिच्या साडीने गळा आवळुन खुन केल्याचे फिर्यादी नामे— नामदेव आसाराम थाटकर वय ४८ रा जतैपुर पोस्ट बारव्हा त. लाखांदुर जि. भंडारा यांचे रिपोर्ट वरून गुन्हा नोदं करून तपासात घेतला होता.

सदर गुन्हयाचे तपासात आरोपीचा शोध घेत असता मृतक हिचा पति व आरोपी प्रमोद कुसन वावरे वय ४० वर्ष, नगर पचांयत समोर भिवापुर यांचेवर संशय असल्याने त्यास ताब्यात घेवुन सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली केली असता उडवाउडवीचे उत्तरे देवू लागला. अधिक विचारपुस दरम्यान आरोपीने मृतक पत्नी हिच्या चारीत्र्यावर संशय असल्याने तिचा साडीने गळा आवळुन खुन केल्याची कबुली दिली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सहायक पोलीस पम्र ोद चौधरी, पोलीस उपनिरीक्षक संदीप सडमेक, किरण महागावे, पोहवा खोब्रागडे, पोलीस अंमलदार रवि वानखेड` यांनी पार पाडली.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे खापा अंतर्गत मौजा कोथुर्गा शिवार ०७ कीमी अंतरावर तळयाचे शेती मध्ये फिर्यादी नामे— माया परुषोत्तम लांबट वय ४१ वर्ष हिचा मृतक पती पुरुषोत्तम लांबट हे ११.३० वा सुमारास आले होते तेव्हा रविन्द्र वसंता लांबट याला फिर्यादीचे पतीने जोरात आवाज दिला तेव्हा रविन्द्र व त्याची आई चंद्रकला लांबट असे काय झाले म्हणुन फिर्यादीचे त्याच्याकडे जात असतांना तेथून आरोपी संदिप लक्ष्मण लांबट हा कु—हाड घेवुन पांधन रस्त्याकडे जात असताना बघितला व त्यानंतर रविंद लांट व त्याचे आई मृतकाच्या जवळ जावुन बघितले असता त्याच्या मानेला व हाताला गंभीर मारहान झाली होती तेव्हा रविन्द्र लांबट याने सरकारी दवाखान्यात आणले. तिथे डॉक्टरांनी तपासुन मृतक घोषित केले. अशा फियादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे खापा येथे खुनाचा गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयामध्ये पोलीसांना माहिती मिळताच तपासाचे चक्र फिरवले. आरोपीस ताब्यात घेवुन सदर गुन्हयाविषयी सखोल चौकशी केली असता फिर्यादी व त्याच्या मृतक पतीचे आरोपी नामे— संदिप लक्ष्मण लांबट याने कॉनलचे पाण्याचे जुन्या भांडणा वरुन तसचे मशीन नेवु दिली नाही या कारणावरून दिनांक १४/०३/२०२४ रोजी चे ११/३० वा सुमारास फिर्यादीचे पती पुरु षोत्तम नत्थु लांबट यांना त्याचे शेतीमध्ये कुऱ्हाडीने मानेवर डावे हातावर मारून जख्मी केले. गुन्हयाचा तपास पोउपनि मिलीदं गेडाम मो. नं. ९४०५१३१३८० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**